**MHRG080004742019** नि.दि.दा.क्र.४१/२०१९

श्रीमती. शेवंता पाताडे वि.
श्री. केशव निकम वगैरे

## नियमित दावा क्रमांक ४१/२०१९ मधील निशाणी क्र.२१ खालील आदेश

प्रतिवादी क्र. ४ ने प्रस्तुत अर्जाव्दारे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० (२) अन्वये त्याचे नाव दाव्यातुन काढुन टाकण्याची विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र. ४ असे कथन करतो की, प्रस्तुतचा दावा प्रतिवादीने हक्कसोडपत्राचा दस्त रद्द करणेकरीता, ठरावाकरीता व निरंतर मनाईकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ४ विरुध्द वादीने दाव्यामध्ये कोणतीही दाद मागितलेली नाही. तसेच प्रतिवादी क्र. ४ याचा दावा मिळकतीमध्ये कोणताही हक्क अथवा हितसंबंध नाही. तो हक्कसोडपत्राच्या दस्तावरील पक्षकारसुध्दा नाही. तो फक्त प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या ओळखीचा व संबंधातील असल्याचे कथन दाव्याच्या परिच्छेद क्र. ५ मध्ये करुन वादीने त्याला दाव्यामध्ये सामाविष्ट केलेले आहे. प्रतिवादी क्र. ४ चा दाव्याशी, दावा मिळकतीशी, दावा मिळकतीसंदर्भात झालेल्या हक्कसोडपत्राशी कोणताही संबंध नसल्यामुळे, त्याचे नाव दाव्यातुन काढुन टाकण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी क्र. ४ ने अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

०३. त्याउलट, वादीने निशाणी क्र. २३ अन्वये प्रस्तुत अर्जास हरकत नोंदविलेली आहे. वादीने असे कथने केले आहे की, प्रतिवादी क्र. ४ ने निशाणी क्र. १७ खाली त्याची कैफियत दाखल केलेली आहे. त्यामध्ये त्याने वादांकित हक्कसोडपत्राच्या दस्तावर त्याच्या स्वाक्ष-या असल्याचे नाकारलेले नाही. त्याने कैफियत दिल्यामुळे आता त्याला दाव्यातुन वगळता येणार नाही. त्याशिवाय, हक्कसोडपत्राचा दस्त क्र. ३२९/२०१९ हा कायदेशीर आहे अथवा बेकायदेशीर आहे हे ठरविण्याकरीता प्रतिवादी क्र. ४ चा पुरावा व साक्ष महत्वाची असल्याचे कथन वादीतर्फे करण्यात आले. त्यापुढे त्यांनी असे कथन केले की, प्रतिवादी क्र. ४ हा दाव्यास आवश्यक पक्षकार आहे किंवा नाही हे अंतिम सुनावणीच्यावेळी ठरविता येउ शकते. प्रतिवादी क्र. ४ ने तुर्तातुर्त मनाई अर्जाची

चौकशी लांबविण्याच्या हेतुने प्रस्तुतचा अर्ज दिलेला असल्याचे कथन करुन खर्चासह फेटाळण्याची विनंती केली.

०४. उभयपक्षातर्फे विधीज्ञांनी केलेला युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले असता, प्रस्तुतचा दावा वादीने दि.२३/०१/२०१९ रोजीचे हक्कसोडपत्र दस्त क्र. ३२९/२०१९ व ३३०/२०१९ रद्द करुन मिळण्याकरीता, व कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. ते दस्त वादीने, प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या लाभात करुन दिल्याचे निदर्शनास येत आहे. प्रत्यक्षात प्रतिवादी क्र. ४ याचा दावा मिळकतीशी अथवा त्या दस्ताशी काहीही संबंध असल्याचे दिसत नाही. प्रतिवादी क. ४ हा त्या दोन्ही दस्ताचा साक्षीदार आहे व त्याच्या त्या दस्तावर स्वाक्ष-या आहेत. परंतु, फक्त तो दस्ताचा साक्षीदार आहे व त्यावर त्याच्या स्वाक्ष-या आहेत म्हणून त्याचा त्या दस्ताशी ठेट संबंध आहे असे म्हणता येणार नाही. त्याशिवाय, तो दावा मिळकतीचा सह-हिस्सेदार, कब्जेदार नाही अथवा दावा मिळकतीमध्ये त्याचा हितसंबंधदेखील नाही. त्यामुळे, तो दाव्यास आवश्यक पक्षकार असल्याचे दिसत नाही.

०५. वादीच्या कथनांप्रमाणे,प्रतिवादी क्र. १ व २ यांनी तिची फसवणुक करुन दस्त निष्पादित करुन घेतलेला आहे. त्यामध्ये प्रतिवादी क्र. ४ चा सहभाग आहे. तसे असल्यास वादी त्याच्याविरुध्द योग्य ती फौजदारी कार्यवाही करु शकतो, दाव्यातील कथनांप्रमाणे त्याने तसे तक्रार अर्जदेखील दाखल केल्याचे दिसत आहे. त्यामुळे, फक्त प्रतिवादी क्र. ४ हा दस्तास साक्षीदार असल्याने व त्याचा तथाकथित फसवणुकीमध्ये सहभाग आहे अशा वादीच्या कथनावरुन तो दाव्यास आवश्यक पक्षकार होउ शकत नाही. वादीने तिच्या म्हणण्यामध्ये प्रतिवादी क्र. ४ चा पुरावा व साक्ष महत्वाची असल्याचे कथन केलेले आहे. तो महत्वाचा साक्षीदार आहे म्हणून त्याला दाव्यात पक्षकार करणे उचित होणार नाही. त्याची साक्षीची आवश्यकता असल्यास, वादीला त्याला साक्षीदार म्हणून तपासण्याची संधी आहे. त्यामुळे, फक्त तो हक्कसोडपत्राच्या दस्तास साक्षीदार आहे म्हणून तो आवश्यक पक्षकार आहे अथवा त्याची दाव्यात पक्षकार म्हणून उपस्थिती गरजेची आहे असे म्हणणे योग्य होणार नाही.

०६. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० (२) च्या तरतुदीप्रमाणे

न्यायालयाला दाव्याच्या कोणत्याही टप्प्यात ज्या पक्षकाराचे नाव अयोग्यपणे जोडण्यात आलेले आहे. त्याचे नाव काढुन टाकण्याचे आदेश करता येतात. प्रस्तुत दाव्यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ४ हा फक्त दस्तास साक्षीदार आहे म्हणून तो आवश्यक पक्षकार आहे असे म्हणणे योग्य होणार नाही. त्यामुळे, तो दाव्यास अयोग्यपणे जोडण्यात आलेला आहे असे दिसते. सबब, त्याला दाव्यातुन काढुन टाकणे गरजेचे आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.-

**आदेश**

| | |
|---|---|
| ०१. | अर्ज (निशाणी क्र. २१)मंजुर करण्यात येत आहे. |
| ०२. | वादीने दाव्यातील प्रतिवादी क्र.४ चे नाव कमी करावे व त्या अनुषंगाने दाव्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करुन दुरुस्ती दाव्याच्या प्रती पुढील तारखेपर्यंत दाखल कराव्यात. |
| ०३. | खर्चाबाबत आदेश नाही. |

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला )

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Pradip Madan Mane
Date: 2021.02.05 12:22:27 +0530

दिनांकः ०५/०२/२०२१
खालापुर.

**(श्री.पी.एम.माने)**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
खालापुर.